2018 VI 21 | 0230 | Seat No. :

Time : 2½ Hours

**MARATHI (T.L.)**

**Subject Code**

| S | 1 | 3 | 3 |
|---|---|---|---|

**Total No. of Questions : 8** **(Printed Pages : 5)** **Maximum Marks : 80**

***सूचना :*** *i) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर लिहा.*
*ii) प्रश्नांचा क्रमांक व उपप्रश्नांचा क्रमांक स्पष्टपणे लिहावा.*
*iii)* ***सर्व*** *प्रश्न सोडविणे* ***आवश्यक*** *आहेत.*
*iv) उजवीकडील अंक* ***गुण*** *दर्शवितात.*

1. अ) पुढील प्रत्येक अपूर्ण विधानासाखाली चार पर्याय दिलेले आहेत. त्यातील अचूक पर्याय पाठ्यपुस्तकाच्या आधारे निवडून अपूर्ण विधान पूर्ण करून पुन्हा लिहा.

1) युद्ध अमानुष असते परंतु **[1]**
अ) माणुसकीचा अपूर्व अनुभवही युद्धात येतो
ब) मानवतेचा कलंक युद्धात दिसतो
क) शत्रूचा क्रूरपणा युद्धात दिसून येतो
ड) जिंकण्याचा नवा आनंद युद्धात मिळतो

2) खरंच, काश्मीर खोऱ्याची खरी सुषमा पहायला **[1]**
अ) दोन वर्ष अपुरी पडतात
ब) दोन महिने अपुरे पडतात
क) दोन डोळे अपुरे पडतात
ड) दोन पाय अपुरे पडतात

ब) खालील उद्गार कोणी व कोणास उद्देशून काढले आहेत ते लिहा. **[3]**

1) ''वाघ का पाठीस लागला आहे तुमच्या'' ?
2) 'बुडाला तर मासा, उडाला तर पक्षी'.
3) 'तुझे शील मला मिळावे अशी इच्छा आहे'.

क) खालीलपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा. **[3]**

1) प्रल्हाद इंद्राच्या कोणत्या गुणांवर खूष झाला ?

2) गावात रोमटे केव्हा नाचत ?

3) लेखिका नंदा मडकईकरांना लॉजमधील खिडकीतून समोरचा पहाड कसा दिसत होता ?

4) दादोजी कोंडदेवांना शिवाजी राजांमध्ये कोणते लक्षण दिसले ?

ड) खाली आपल्या पाठ्यपुस्तकातील **एका** धडयाचे नाव व कंसात लेखकांची नावे दिलेली आहेत. दिलेल्या धडयाच्या लेखकाचे नाव लिहा. **[1]**

'खरा वैज्ञानिक कोण'

[रणजित देसाई/जयंत विष्णू नारळीकर/ग. प्र. प्रधान]

2. अ) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **दोन** ते **तीन** वाक्यात लिहा. **[4]**

1) लेखिका नंदा मडकईकरांनी गौरीशंकर मंदिर परिसराचे कसे वर्णन केले आहे ?

2) शिवाजी राजांनी पाटलांना हात-पाय तोडण्याची कठोर शिक्षा का दिली ?

3) गोपूने आणलेले भात घेण्यास आईने नकार का दिला ?

ब) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **चार** ते **पाच** वाक्यांत लिहा. **[6]**

1) मेजर रॉयच्या मते युद्धामधील खरी अमानुषता कोणती ?

2) आंबेड्याच्या गावकऱ्यानी लेखकाचे स्वागत कसे केले ?

3) लेखक मारुती चितमपल्लीनी खाडीकाठच्या जंगलाचे वर्णन कसे केले आहे ?

3. अ) पुढील विधानाखाली दिलेल्या **चार** पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून ते विधान पूर्ण करून पुन्हा लिहा.

तिचा दाटलेला पान्हा **[1]**

अ) काळा डांबरच झाला

ब) काळ्या रंगात भिजला

क) आता अंधारच झाला

ड) आता कासाविस झाला

ब) तुमच्या पाठ्यपुस्तकातील कवितांच्या आधारे 'अ' गटात दिलेल्या काव्यांशाशी 'ब' गटात दिलेल्या काव्यांशांच्या योग्य पर्याय जोडून काव्यपंक्ती पुन्हा लिहा. [2]

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| 1) उगा वेर्थ खातो | अ) ऐकून वचन |
| 2) उद्दाम गाडीचे | ब) तुकाम्हणे दुसरे |
| | क) वितळले तनमन |
| | ड) उगा काळ जातो |

क) खालील कवितांच्या ओळीतील मोकळ्या जागी कंसात दिलेल्या पर्यायी शब्दांपैकी योग्य शब्द घालून ओळी पूर्ण करून पुन्हा लिहा. [2]

1) अवधी सता आली हाता ।
नामयाचा ___________ दाता ।
(खेचरी/विठ्ठल/स्वामी)

2) पहा ___________ चरोनि होती झाडावर गोळा
(पक्षी/विहंग/पाखरे)

4. अ) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा. [2]

1) तुकारामांनी दैवत असे कोणास म्हटले आहे ?

2) कवीने मावळत्या सूर्याला कशांची उपमा दिली आहे ?

3) कवी पंचप्राणांच्या आरतीने कोणाची पूजा करायला सांगतात ?

ब) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **तीन** ते **चार** वाक्यात लिहा. [6]

1) जमिनीने आगगाडीचे गर्वहरण कसे केले ?

2) 'गई लेखनाची यात संत रामदासानी काळ व जीवन यांचे कोणते महत्व सांगितले आहे ?

3) 'हे बंध रेशमाचे या कवितेच्या आधारे प्रेमाची थोरवी लिहा.

5. अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** वाक्प्रचाराचा योग्य अर्थ लिहून त्या वाक्प्रचाराचा योग्य वाक्यात उपयोग करून लिहा. [2]

1) तोंडचे पाणी पळणे

2) खडे फोडणे.

ब) खालील विधाने कंसातील सुचनेप्रमाणे लिहा.

1) आदित्यरावांनी घंटा वाजवली. **[1]**
(प्रयोग ओळखून लिहा)

2) शेताची राखण करण्यासाठी तयार केलेले बाहुले. **[1]**
(शब्दसमूहा बद्दल एक शब्द लिहा)

3) खाडीच्या कीनाऱ्यानं आमची होडी झरझर जात होता. **[1]**
(वाक्य शुद्ध करून लिहा)

4) त्याची आई खूप दूर राहिली होती. **[1]**
(वाक्य वर्तमानकाळात लिहा)

क) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखून लिहा. **[2]**
गोपूने <u>मान</u> डोलावली आणि खाली पाहत तो <u>एकाग्रपणे</u> भातगोटे निवडू लागला.

ड) कंसातील सूचनेप्रमाणे बदल करून लिहा.

1) पाप, खडक, मेहनत **[2]**
(कोणत्याही दोहोंची विशेषणे बनवा)

2) व्यक्ती, बाल, प्रसिद्ध **[2]**
(कोणत्याही दोहोंची भाववाचक नामे बनवा)

3) साहचर्य, अतिथी, आरसा **[2]**
(कोणत्याही दोहोंचे समानार्थी शब्द लिहा)

4) नफा, स्पृश्य, आस्तिक **[2]**
(कोणत्याही दोहोंचे विरुद्धार्थी शब्द लिहा)

6. अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **वीस** ते **पंचवीस** ओळीत निबंध लिहा : **[7]**

1) माझा आवडता खेळाडू

2) शालेय जीवनात सहलीचे महत्व

3) छत्रीचे आत्मवृत्त

4) प्लास्टिक कचरा - एक दुखणं

ब) खालील मुद्यांच्या आधारे सुमारे **दहा** ते **पंधरा** ओळीत गोष्ट लिहून तिला योग्य शीर्षक लिहा : **[5]**
एक वृद्ध बाई — तिच्या एकुलत्या मुलाचा सर्पदंशाने मृत्यू होणे — गौतम बुद्धांकडे जीवंत करण्याचे औषध मागणे — बुद्धांनी उपाय सुचविणे — ज्या घरात आतापर्यंत एकही मृत्यू झाला नाही त्या घरातून मूठभर तांदूळ आण असे बुद्धांचे सांगणे — वृद्ध बाईचे घरोघर फिरणे — बुद्धांनी सांगितल्या प्रमाणे एकही घर न सापडणे — हताश होऊन बुद्धांकडे परतणे — बुद्धांनी तिला समजावणे — शांत होऊन तिचे घरी परतणे.

7. अ) शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये झालेला संवाद पाच ते सहा वाक्यांत लिहा. **[5]**

ब) अमेय/यामिनी देसाई गावकरवाडा मये डिचोली गोवा हा/ही परगावी असलेल्या आपल्या धाकट्या भावाला तालुका पातळीवरील निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाव्याबद्दल अभिनंदन करणारे पत्र लिहितो/लिहिते. या पत्राचा नमुना आठ ते दहा वाक्यांत तयार करून लिहा. **[5]**

8. अ) श्री भगवती विद्यालय, पार्से, पेडणे-गोवा येथे साजरा झालेल्या योगदिवस (21 जून) कार्यक्रमाचा वृत्तांत खालील मुद्यांच्या आधारे बारा ते पंधरा वाक्यात तयार करून लिहा. **[5]**

योगदिवस (21 जून) — प्रमुख पाहुणे कोण होते — त्यांचे स्वागत, परिचय कोणी करून दिला — योगदिनाचे महत्व कोणी सांगितले — कोणकोणत्या योगासनांची प्रात्यक्षिके दाखविण्यात आली — प्रमुख पाहुण्यांच्या भाषणातील दोन मुद्दे — आभारप्रदर्शन, सूप्रसंचालन कोणी केले.

ब) पुढील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

'ग्रंथ हेच गुरु महान । सदा देती अमोल ज्ञान' ही उक्ती यथार्थ आहे. ग्रंथ हेच गुरुप्रमाणे आपल्याला ज्ञान देत असतात.आपणास जे ज्ञान देतात, सन्मार्गाला लावतात त्यांनाच गुरु असे म्हणतात. म्हणूनच गुरुपौर्णिमा साजरी केली जाते. याच दिवशी गुरुची पूजा करून त्याना सन्मान दिला जातो. भारतीय संस्कृतीत अनेक चांगले ग्रंथ आहेत. जसे गीतादर्शन, रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी इ. ग्रंथांना गुरुची उपमा दिली आहे. कारण गुरुप्रमाणेच ग्रंथही मार्गदर्शन करीत असतात. डॉ. आंबेडकर ग्रंथांना आपले स्नेही, सोबती मानीत असत. ग्रंथ वाचनात शांत आयुष्य वेचण्यासारखा दुसरा आनंद नाही. उत्तम ग्रंथ आपण नेहमी वाचले पाहिजेत. त्यामुळे आपल्या ज्ञानात भर पडेल. गुरु हा नेहमी आपल्या शिष्याचे कल्याण करत असतो. गुरूचा आशीर्वाद प्राप्त झाल्यास आपले आयुष्य सफल होते. तसेच उत्तम ग्रंथांचे वाचन केल्याने आपल्या जीवनाचे सार्थक होते.

**प्रश्न :**

1) गुरु कोणाला म्हणतात ? **[1]**

2) डॉ. आंबेडकर ग्रंथाना काय मानीत ? **[1]**

3) ग्रंथवाचनाचे फायदे कोणते ? **[1]**

4) आपले आयुष्य केव्हा सफल होते ? **[1]**

5) उताऱ्याला योग्य शीर्षक द्या. **[1]**

---